भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक ०७.१२.२०१९ ते ११.१२.२०१९)

| अंक ९८/२०१९ | दिनांक ०६.१२.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (३०/११/२०१९ ते ०६/१२/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०७/१२/२०१९ ते ११/१२/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/११ | ०१/१२ | ०२/१२ | ०३/१२ | ०४/१२ | ०५/१२ | ०६/१२ | दिनांक | ०७/१२ | ०८/१२ | ०९/१२ | १०/१२ | ११/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३६.० | ३५.० | ३५.५ | ३५.५ | ३१.५ | ३४.० | ३४.० | कमाल तापमान (अं. से) | ३३ | ३४ | ३४ | ३३ | ३३ |
| २२.० | २१.० | २१.० | २०.५ | २०.५ | २३.० | २२.५ | किमान तापमान (अं. से) | २१ | २१ | २२ | २२ | २२ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ - मेघाच्छादन (ऑक्टा.) | २ | १ | ७ | ४ | १ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | दुपार - मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९५ | ७५ | ७६ | ६४ | ६० | ७० | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७३ | ७५ | ७८ | ७३ | ७२ |
| ५१ | ४७ | ४१ | ६२ | ४६ | ४५ | ४५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४५ | ४३ | ५१ | ४६ | ४४ |
| १.१ | १.८ | २.८ | ३.१ | ४.८ | ३.८ | २.४ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००९ | ०१० | ००७ | ०१० | ००८ |
| स्थिर | स्थिर | पुर्वे | पुर्वे | पुर्वे | पुर्वे | स्थिर | सकाळ - वा-याची दिशा | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून |
| पुर्वे | पुर्वे | पुर्वे | पुर्वे | पुर्वे | पुर्वे | पुर्वे | दुपार - वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४५९१.० | ४५९१.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यामध्ये हवामान कोरडे व अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | रब्बी पेरणी | रब्बी हंगावातील भात लागवडीच्या पुर्व तयारीस सुरुवात करावी. उन्हाळी भात पीकासाठी १ हेक्टर क्षेत्र लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रात गादीवाफे तयार करुन घ्यावेत. जमिनीचा उतार लक्षात घेऊन निच-याच्या जागी तळाशी १२० सेमी आणि पृष्ठभागाशी ९० सेमी रुंदीचे ८ ते १० सेमी उंचीचे योग्य त्या लांबीचे गादी वाफे तयार करावेत. वाफ्यात प्रती गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया व १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे. बियाण्यास ३% मिठाच्या द्रावणाची (३०० ग्रम मीठ/१० लि. पाणी) प्रक्रिया करावी. वाफ्यावर ५ ते ८ से.मी. अंतरावर ओळीमध्ये १ ते २ सेमी खोलीवर बी पेरुन घ्यावे. जाड दाण्यांच्या जातीसाठी ५० किलो तर बारीक दाण्यांच्या जातीसाठी ४० किलो बियाणे वापरावे. वायंगणी भात पीकाची पेरणी सुधारीत बियाण्यांचा वापर करुन करावी. |
| कुळीथ, चवळी व कडवा वाल | अंकुरण | खरीपातील लांबलेल्या भात कापणीमुळे कुळीथ, चवळी व कडवा वाल या रब्बी पिकांची पेरणी उशीराने झाली. जिमीनीतील ओलाव्याच्या कमतरतेमुळे ज्या ठिकाणी पिकांची ऊगवणी झाली नसल्यास पिकास बाहेरुन पाण्याची व्यवस्था करावी. |
| भुईमुग, सुर्यफुल व मोहोरी | रब्बी पेरणी | रब्बी उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावी. जमिन खोल नांगरुन, ढेकळे फोडुन व हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट मिसळुन तयार करावी. पेरणीसाठी टी.जी.२६, टी.ए.जी.२४, टी.पी.जी.४१, कोकण गौरव, कोकण टपोरा या जातींचे बियाणे हेक्टरी १२५ ते १५० किलो या प्रमाणात वापरावे.<br>रबी सुर्यफुल लागवडीसाठी जमिन उभी-आडवी खोल नांगरुन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टर १० ते टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट जमिनीवर पसरुन मातीत मिसळावे. पेरणीसाठी. पेरणीसाठी सुर्यफुलाच्या मॉर्डन, एस.एस.५६, बी.एस.एच-१ इ. सुधारीत जातींचा वापर करावा. हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे वापरावे. पेरणीपुर्वी बियाणे १२ तास पाण्यात भिजवुन नंतर सावलीत वाळवावे. तसेच प्रती किलो २ ग्रम या प्रमाणात बुरशीनाशक चोळावे.<br>मोहरी पिकाच्या पेरणीसाठी हवामान योग्य असल्याने पुसा बोल्ड किंवा वरुणा या जातीची लागवड करावी. पिकाची पेरणी ४५ x १० से.मी अंतरावर ३ ते ४ से.मी. खोल करावी. पेरणीपुर्वी प्रती गुंठ्यास १ किलो युरिया आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ओळीत पेरुन द्यावे. |
| आंबा | पालवी | ढगाळ वातावरण असल्यास मोठ्या प्रमाणावर तुड्तुड्यांची पैदास होते. त्यातच मोठ्या प्रमाणावर कोवळी पालवी तुड्तुड्यांना उपलब्ध झाल्यास पालवीवर मोठ्या प्रमाणावर तुड्तुड्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. नवीन पालवीवर तुड्तुडे, फुलकीडे व खवले किडीच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रिन २.८% प्रवाही (०.९ मिली प्रती १ लीटर पाणी) किंवा थायोमेथॉक्झोन २५% (WDG) (०.१ ग्रम प्रती लीटर पाणी) या किटकनाशकांची फवारणी करावी.<br>आंबा पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे. |
| काजु | मोहोर | ढगाळ वातावरणामुळे काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि. ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पड्लेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. |
| पाणलोट व्यवस्थापन | | पाणलोट क्षेत्रातील नाल्यांवर, नदीवर योग्य ठिकाणी पाणी साठवुन ते शेतीसाठी वापरण्याच्या दृष्टीने शेतक-यांनी लोकसहभागातुन दगड मातीचे कच्चे बंधारे किंवा दगड, माती व सिमेंटच्या रिकाम्या पोत्यांच्या सहाय्याने वनराई बंधारे बांधावेत. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|